**मे. श्री सिमेंट लिमीटेड, पो.बॉ. क्रं. ३३, बांगरनगर, बेवार, राजस्थान-३०५९०१ यांनी त्यांच्या प्रस्तावित क्लिंकर-१.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष, सिमेंट-३.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष (ऑर्डीनरी पोर्टलँड सिमेंट, पोर्टलँड पोझोलोना सिमेंट, पोर्टलँड स्लॅग सिमेंट, सल्फेट रझिस्टिंग सिमेंट, रॅपिड हार्डनिंग पोर्टलँड सिमेंट आणि कॉम्पोझिट सिमेंट), कॅप्टिव्ह पॉवर प्लांट-२० मेगावॅट, वेस्ट हीट रिकव्हरी सिस्टीम-९.५ मेगावॅट, सिंथेटिक जिप्सम-१५६० ट्रन प्रति दिन (६५ टन प्रतितास) आणि डिझेल जनरेटर सेट्स-२५०० किलोव्होल्ट अँपियर (१x२५०० किलोव्होल्ट अँपियर किंवा २x१००० किलोव्होल्ट अँपियर आणि १x५०० किलोव्होल्ट अँपियर किंवा १x१००० किलोव्होल्ट अँपियर, २x५०० किलोव्होल्ट अँपियर आणि २x२५० किलोव्होल्ट अँपियर), प्रकल्पस्थळ निमसडा, कोंढाळा व दहेगाव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर येथे प्रकल्प उभारण्याच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २९/१२/२०२५ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | सर्वे क्र. १२८/१, निमसाडा-कोंढाळा गाव रस्त्याच्या दरम्यान, निमसाडा गावामार्गे जाणाऱ्या गाव रस्त्यावर, कोंढाळा, तालुका वरोरा, जिल्हा चंद्रपूर. |

**प्रस्तावना:-**

मे. श्री सिमेंट लिमीटेड, पो.बॉ. क्रं. ३३, बांगरनगर, बेवार, राजस्थान-३०५९०१ यांनी त्यांच्या प्रस्तावित क्लिंकर-१.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष, सिमेंट-३.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष (ऑर्डीनरी पोर्टलँड सिमेंट, पोर्टलँड पोझोलोना सिमेंट, पोर्टलँड स्लॅग सिमेंट, सल्फेट रझिस्टिंग सिमेंट, रॅपिड हार्डनिंग पोर्टलँड सिमेंट आणि कॉम्पोझिट सिमेंट), कॅप्टिव्ह पॉवर प्लांट-२० मेगावॅट, वेस्ट हीट रिकव्हरी सिस्टीम-९.५ मेगावॅट, सिंथेटिक जिप्सम-१५६० टन प्रति दिन (६५ टन प्रतितास) आणि डिझेल जनरेटर सेट्स-२५०० किलोव्होल्ट अँपियर (१x२५०० किलोव्होल्ट अँपियर किंवा २x१००० किलोव्होल्ट अँपियर आणि १x५०० किलोव्होल्ट अँपियर किंवा १x१००० किलोव्होल्ट अँपियर, २x५०० किलोव्होल्ट अँपियर आणि २x२५० किलोव्होल्ट अँपियर) प्रकल्पस्थळ निमसडा, कोंढाळा व दहेगाव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर येथे प्रकल्प उभारण्याच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी करिता प्रकल्प प्रवर्तकांनी अर्ज सादर केला. पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक ३१ मे, २०२५ ला मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-३ (ब) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. श्री सिमेंट लिमीटेड, पो.बॉ. क्रं. ३३, बांगरनगर, बेवार, राजस्थान-३०५९०१ यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २८/०८/२०२५ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द हितवाद, नागपूर यात इंग्रजीत दिनांक २५/११/२०२५ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीमध्ये व सीडी खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, VCA समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४. प्रादेशिक कार्यालय/ उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय अधिकारी कार्यालय वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
१०. नगर परिषद कार्यालय वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
११. गट-ग्राम पंचायत कार्यालय कोंढाळा (येन्सा), ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
१२. ग्राम पंचायत कार्यालय निमसडा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
१३. ग्राम पंचायत कार्यालय दहेगाव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
१४. गट-ग्राम पंचायत कार्यालय बेलगांव (आटमुडी), ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
१५. ग्राम पंचायत कार्यालय माजरा रै., ता. वरोरा, जि. चंद्रपूर.

१६. ग्राम पंचायत कार्यालय चिनोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
१७. गट-ग्राम पंचायत कार्यालय मोहबाळा (नायदेव), ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
१८. ग्राम पंचायत कार्यालय डोंगरगांव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
१९. ग्राम पंचायत कार्यालय सालोरी-येन्सा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
२०. ग्राम पंचायत कार्यालय, चरूरखटी, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
२१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते २० वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-८९/२०२५ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२५१२२३-एफटीएस-०१८६ दिनांक २३/१२/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. नितीन व्यवहारे, अपर जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्प पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती

- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयक प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

**१) श्री. विशाल नानाजी पारखी, सरपंच, ग्रामपंचायत दहेगाव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मे. श्री सिमेंट लि. या उद्योगाने सिमेंट प्रकल्पाकरिता दहेगाव, कोंढाळा, निमसडा या सीमाक्षेत्रातील जमीन विकत घेतलेली आहे असे या तीनही ग्रामपंचायतींना कळविलेले आहे. परंतु काही दिवसांपूर्वी दैनिक वृत्तपत्राच्या माध्यमातून सदर जमीन सिमेंट उद्योगाकरिता न घेता कोळसा खाण व कोल वॉशरी उद्योगाकरिता संपादित करण्यात आल्याची बातमी प्रकाशित करून स्थानिकांमध्ये संभ्रम पसरविण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर दोन दिवसांमध्ये सदर बातमीचे दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्राद्वारे खंडन करण्यात आले. त्यामुळे दहेगाव, कोंढाळा व निमसडा या क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांमध्ये या परिसरात सिमेंट उद्योग प्रस्तावित आहे किंवा कोळसा खाण प्रस्तावित आहे याबाबत संभ्रम आहे. यासदंर्भात जिल्हा प्रशासन व कंपनी प्रशासनाकडून स्पष्टीकरण होणे गरजेचे आहे. तसेच खोटे वृत्त प्रकाशित करणाऱ्या पत्रकारांवर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात येणार याबाबतचे स्पष्टीकरण होणे गरजेचे आहे. त्याचसोबत दहेगाव, कोंढाळा व निमसडा या गावातील शेतकऱ्यांची जमीन या कंपनीने खरेदी केलेली आहे. त्यामुळे आम्ही पिढ्यानपिढ्या शेती करणारे शेतकरी व त्यावर अवलंबून असलेले मजुरांचे उपजिविकेचे साधन हिरावून गेलेला आहे. त्यामुळे माझी कंपनी प्रशासन व जिल्हा प्रशासनाला विनंती करतो की त्यांनी या क्षेत्रातील प्रकल्पग्रस्त शेतकरी व शेतमजुरांना उद्योगामध्ये त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनूसार रोजगाराची संधी उपलब्ध करून | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, या ठिकाणी सिमेंट उद्योगाची स्थापना होणार आहे. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडे या परिसरात सिमेंट उद्योगाकरिता अर्ज सादर करण्यात आला आहे त्यामुळे या क्षेत्रात कोळसा खाणीचा कोणत्याही प्रकारे संबंध नाही. तसेच सदर सिमेंट प्रकल्पालगत मे. श्री सिमेंट लि.च्या चुनखडी खाणीचा प्रस्ताव आहे व त्याबाबतची जनसुनावणी दि. ३१/१२/२०२५ रोजी प्रस्तावित आहे. पर्यावरण सल्लागार श्री. कवाडीया यांनी प्रकल्पाचे सादरीकरणादरम्यान सांगितल्याप्रमाणे सिमेंट उत्पादन करण्याकरिता चुनखडीचा वापर करण्यात येतो. त्यामुळे स्थानिकांमध्ये कोळसा खाणीसदंर्भात असलेला संभ्रमाकडे दुर्लक्ष करावे कारण या क्षेत्रात फक्त सिमेंट उद्योग व चुनखडी खाण प्रस्तावित आहेत. या क्षेत्रात कोळसा खाणीचा कोणताही प्रकल्प प्रस्तावित नाही.<br><br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, या क्षेत्रात फक्त सिमेंट उद्योग प्रस्तावित आहे. कोळसा खाणीचा प्रकल्प प्रस्तावित नाही. |

| | | |
|---|---|---|
| | द्यावी. शासनाच्या नियमानूसार ८० टक्के स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावा परंतु या क्षेत्रातील अस्तित्वात असणाऱ्या उद्योगांमध्ये रोजगार देण्यात आलेला नाही. त्यामुळे माझी कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी ८० टक्के स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. | |

## २) श्री. भानुदास उद्धवराव बोधाने, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही कोंढाळा ग्रामस्थांच्या वतीने आमच्या काही समस्या मांडलेल्या आहेत त्या आम्ही मौखिक स्वरूपात मांडणार आहोत तसेच लिखीत स्वरूपात आहेत. ते आपण स्वीकारावे अशी माझी विनंती आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ३) श्री. प्रविण पांडुरंग देवतळे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे काही निवेदन आहे ते आपणाकडे सादर करत आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ४) श्री. सुरेंद्र गोपाळराव देठे, बेलगांव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे जनसुनावणी आयोजित केलेली आहे. त्या अनुषंगाने येथे सांगण्यात आले की प्रकल्पाचे क्षेत्र एकूण ४२.७६ हेक्टर इतके आहे. त्यापैकी आपण कोंढाळा, बेलगांव व निमसडा येथे किती एकर जमीन अधिग्रहीत केलेली आहे याबाबत माहिती देण्यात यावी कारण जनसुनावणीच्या जाहीरातीमध्ये एकूण १० ग्रामपंचायतींची नावे नमूद आहेत. त्यामध्ये चरूरखटी ते चिनोरा, मजरा पर्यंत गावांच्या नावांचा समावेश आहे. त्यामुळे सदर उद्योग भविष्यात विस्तारीत | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वायु प्रदूषणाबाबत आमच्या सिमेंट कंपनीने जवळपास रू. १६७ कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. सिमेंट कपन्यांमधून होणाऱ्या विविध प्रदूषणाच्या स्त्रोतांकरिता अद्यावत तंत्रज्ञान असलेले ईलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर व बॅग फिल्टर बसविण्याचे प्रस्तावित आहे. कोल मिल व रॉमिल मध्ये दोन ईलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटरची तरतूद करण्यात आली आहे. तसेच तीन बॅग हाऊसची |

| | | |
|---|---|---|
| | होऊन इतर गावांमध्ये उद्योग उभारणार आहेत किंवा कसे याबाबत माझा प्रश्न आहे. बेलगांव आणि कोंढाळा गावामध्ये पाण्याची तीव्र टंचाई आहे. सद्य:स्थितीमध्ये बेलगांव येथे बैलबंडीने पाणी आणावे लागत आहे. अस्तित्वात असलेल्या मे. सनफ्लॅग भूमिगत खाणीने गावकऱ्यांच वाटोळं केले आहे त्यामुळे आमचा या प्रस्तावित प्रकल्पावर देखील विश्वास कमी आहे. त्यामुळे आम्हाला कंपनी प्रशासनाकडे लेखी स्वरूपात स्पष्टोक्ती पाहिजे. सादरीकरणादरम्यान सांगितल्याप्रमाणे सदर प्रकल्पामध्ये एकूण १६७० मनुष्यबळाची आवश्यकता असणार आहे. परंतु सदर मनुष्यबळाची आवश्यकता ही दररोज असणार आहे किंवा मासिक स्तरावर असणार आहे याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. तसेच शैक्षणिक पात्रतेनूसार रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे नमूद आहे. तसेच प्रकल्पग्रस्त गावांमधील किती टक्के स्थानिकांना रोजगार देण्यात येईल व किती टक्के स्थानिकांना बेरोजगार घोषित करण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. प्रस्तावित सिमेंट प्रकल्पामुळे होणाऱ्या वाहतूकीमुळे रस्त्यालगतच्या शेतकऱ्यांचे नूकसान प्रस्तावित असल्याने शेतकऱ्यांना किती प्रमाणात नूकसान भरपाई प्रकल्प प्रवर्तकांतर्फे देण्यात येणार आहे. तसेच वाहतूक कोणत्या मार्गाने करणार आहे याची माहिती देण्यात यावी. येन्सा व कोंढाळा हा एकच मार्ग उपलब्ध आहे व या मार्गाची अत्यंत दुर्दशा झालेली आहे. प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात येणार असून त्यामुळे वायु प्रदूषण होणार आहे. त्याबाबत कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी. तसेच परिसरात करण्यात येणाऱ्या वृक्षारोपणाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. | तरतूद करण्यात आली आहे आणि जवळपास संपूर्ण सिमेंट उद्योगामध्ये ८८ बॅग फिल्टर्स बसविण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर प्रस्तावित प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा ही अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित आहे व त्यामुळे ९९.९९ टक्के प्रदूषण नियंत्रणात ठेवता येईल. तसेच लोह खनिज, बॉक्साईट व राख इत्यादी प्रकारच्या कच्च्या मालाची साठवणूक ही बंदिस्त शेड मध्ये करण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरात धुळीचे उत्सर्जन होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी असणार आहे. उत्पादित मालाची साठवणूक ही सायलोमध्ये करण्यात येणार आहे. धुळीचे उत्सर्जन होऊ नये याकरिता उपरोक्त उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच प्रस्तावित चुनखडी खाणीमधून चुनखडीच्या वाहतुकीकरिता बंदिस्त कन्व्हेअर बेल्टची व्यवस्था करण्यात येईल ज्यामुळे वाहतूकीदरम्यान धुळीचे उत्सर्जन होऊन प्रदूषण होणार नाही. तसेच सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची वेळोवेळी देखभाल व दुरूस्ती करण्यात येईल. त्याकरिता दरवर्षी ३.५ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याकरिता पर्यावरण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सदर पर्यावरण कक्ष या सर्व उपाययोजनांवर लक्ष ठेवणार. तसेच वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासण्याकरिता सतत वायु गुणवत्ता तपासणी सयंत्रणा बसविण्यात येणार असून ते म.प्र.नि. मंडळ व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरशी जोडलेली असेल. सदर उद्योगातून निघणाऱ्या उत्सर्जनाची माहिती सामान्य नागरीकांसाठी मुख्य प्रवेशद्वारावर दर्शविण्यात येईल. वाहतूकीकरिता कंपनद्वारे वेगळा रस्ता तयार करण्यात येईल. सदर रस्ता महामार्गाशी जोडण्यात येईल. गावामधून कोणत्याही प्रकारची वाहतूक करण्यात येणार नाही. आमच्या प्रकल्पामध्ये ४२.७६ हेक्टर जमीन असणार आहे व त्यापैकी ३३ टक्के म्हणजेच जवळपास १४.११ हेक्टर जमीनीवर हरीत पट्टा निर्माण करण्यात येणार आहे. उद्योगाच्या संरक्षण भिंतीलगत ३ स्तरीय |

| | | |
|---|---|---|
| | | हरीत पट्टा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार निर्माण करण्यात येणार आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमानूसार प्रति हेक्टर २५०० झाडांची लागवड करणे गरजेचे आहे. सदर प्रकल्पामध्ये ३५,२७५ झाडांची लागवड करण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पाचे बांधकाम करताना जवळपास ८७० मनुष्यबळाची आवश्यकता असणार. तसेच प्रकल्प चालु करताना परत ८०० मनुष्यबळाची गरज असणार आहे. त्यामध्ये ३०० कायमस्वरूपी कामगार व ५०० कंत्राटी पद्धतीचे कामगार असणार आहे. सदर उद्योग चालविण्याकरिता दररोज मनुष्यबळाची गरज असणार आहे व सदर उद्योग २४ कार्यरत ठेवण्यासाठी मनुष्यबळाची गरज असणार आहे. सदर उद्योग समुहाचे संपूर्ण भारतात उद्योग कार्यरत आहेत व सर्व प्रकल्पांमध्ये स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देण्यात येईल. उद्योगामध्ये काम करण्याकरिता कुशल कामगारांची आवश्यकता असते. त्यानुसार या प्रकल्पामध्येदेखील स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनूसार रोजगार देण्यात येईल. |

५) <u>**श्री. मंगेश अंबादास पाचपुते, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सीएसआर निधी कंपनीतर्फे ग्रामपंचायतींना गावाचा विकास करण्याकरिता नियमितपणे देण्यात यावा. तसेच सदर निधीचा वापर कोंढाळा गावाच्या विकासासाठी वापरण्यात यावा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

६) **श्री. कुणाल विलास वाघ, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने भौतिक सोई सुविधा पूरविण्यासाठी कोंढाळा गावाला दत्तक घेण्यात यावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

७) **श्री. प्रविण पांडुरंग देवतळे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीमध्ये प्रथमत: स्थानिकांना मौजा कोंढाळा दरम्यानच्या सुशिक्षित व अशिक्षित पुरूष व महिला बेरोजगारांना ठेकेदारी पद्धतीने न धेता कायम स्वरूपी शैक्षणिक पात्रतेनूसार कंपनी पेरोल वर प्रथम प्राधान्य देण्यात यावे व तसे आश्वासन प्रत्येक प्रकलग्रस्त शेतकऱ्यांना तुम्ही दिले होते. स्थायी रोजगार हा कोंढाळा येथील कंपनीमध्ये देण्यात यावा. कोंढाळा गावातील जे युवक व युवती यांना १८ वर्षा खालील असलेल्या त्या युवकांना भविष्यात १८ वर्ष पूर्ण झाल्यावर त्यंना रोजगार प्रशिक्षण देण्यात यावे व त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात यावी.<br>१) **वेतन व आर्थिक सुविधा:-** मासिक पगार (मूळ वेतन व महागाई भत्ता), ओव्हरटाईम भत्ता बोनस (कायदेशीर/पर फॉर्मन्स आधारित), वार्षिक वेतनवाढ.<br>२) **सामाजिक सुरक्षा योजना:-** भविष्य निर्वाह निधी (PF), कर्मचारी राज्य विमा योजना (ESIC)/वैद्यकीय विमा, ग्रॅच्युईटी (५ वर्ष सेवा पूर्ण केल्यावर), अपघात विमा.<br>३) **रजा सुविधा:-** वार्षिक रजा (Earned Leave), आजारी रजा (Sick Leave), कॅज्युअल रजा, राष्ट्रीय सणांच्या सुट्ट्या, मातृत्व/पितृत्व रजा.<br>४) **आरोग्य व सुरक्षा:-** कंपनी डॉक्टर/आरोग्य तपासणी, सेफ्टी किट (हेल्मेट, शूज, ग्लोव्ह्ज इ.) आपात्कालीन ॲम्बुलन्स सुविधा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ५) **प्रवास व निवास भत्ता:-** बस/वाहतूक सुविधा किंवा प्रवास भत्ता कंपनी क्वार्टर्स/घरभाडे भत्ता (HRA), कॅन्टीन/जेवण सुविधा<br>६) **प्रशिक्षण व पदोन्नती:-** कौशल्य विकास प्रशिक्षण, सेफ्टी ट्रेनिंग, पदोन्नतीच्या संधी.<br>७) **इतर सुविधा:-** ओळखपत्र (ID Card), युनिफॉर्म, पेन्शन योजना (लागू असल्यास) कर्ज/अॅडव्हान्स सुविधा. | |

## ८) श्री. सौरभ विजय देवतळे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गावामध्ये पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई असून पिण्याचे पुरेसे पाणी व बाह्यवापरासाठी मुबलक पाणी उपलब्ध करून द्यावे व शुद्ध आरओ वॉटर बसवून द्यावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ९) श्री. सुनिल देशमुख, पर्यावरण विभाग प्रमुख, मे. श्री सिमेंट लिमिटेड:-

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | भारत सरकारच्या दि. २०/१०/२०२२ रोजी प्रकाशित केलेल्या कार्यालयीन आदेशानूसार कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी व पर्यावरणीय सामाजिक जबाबदारीचे व्यवस्थापन करण्यात येते. स्थानिक नागरीकांतर्फे जनसुनावणी दरम्यान उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांची नोंद घेऊन त्याबाबतचा सीएसआर अंतर्गत प्रस्तावित विकासकामांचा कालबद्ध आराखडा तयार करण्यात येतो. सदर कृती आराखडा पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात येतो. याबाबत मंत्रालयातर्फे कालावधी व आर्थिक तरतूदीबाबत विचारणा करण्यात येते. तसेच सर्व प्रकल्पांना त्याचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यानूसारच सीएसआर अंतर्गत कामे करण्यात येतात. प्रकल्प सुरू झाल्यानंतर सीएसआर अंतर्गत प्रकल्पालगतच्या ग्रामपंचायतींसोबत चर्चा करून विकासकामे करण्यात येतील. ग्रामपंचायतींमध्ये ज्या ठिकाणी आर ओ प्लांटची गरज असेल अशा ठिकाणी आर ओ प्लांट उभारण्यात येऊन शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा पूरविण्यात येईल. तसेच पिण्याच्या पाण्याच्या सुविधेसाठी ग्रामपंचायती व सरपंचांसोबत चर्चा करून हॅंडपंप देखील बसविण्यात येईल. पाण्याच्या संवर्धनासाठी आमच्या कंपनीतर्फे आधीच पावले उचलण्यात येतील. गावांमध्ये अस्तित्वात असलेल्या तळ्यांचे सौंदर्यीकरण व खोलीकरण करून त्यामध्ये पाण्याची पातळी वाढविण्याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. त्यामुळे पावसाचे पाणी साठवण्यास मदत होईल. याबाबत गावकऱ्यांशी चर्चा करून योग्य ती पावले उचलण्यात येतील. |

१०) **श्री. संजय शेरकुरे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोंढाळा गावामध्ये ब्लास्टींगमुळे कोणत्याही घरांना धोका होऊ नये याची दक्षता कंपनीने घ्यावी. घरांचे नूकसान झाल्यास त्याची नूकसान भरपाई कंपनीला द्यावी लागेल. तसे न झाल्यास गावाचे पुनर्वसन करून योग्य मोबदला व जागेची भरपाई जमीन, घरे, शेती, झाडे यांचे योग्य मुल्यांकन करून भरपाई द्यावी. रोख रक्कम व पर्यायी जमीन मिळावी. पुनर्वसन करताना हे गावापासून कमीत कमी १ किलोमीटर अंतरावर असायला हवे. गावातील सुरक्षित भवितव्यासाठी खाण हे किती अंतरावर राहील याची माहिती देण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

११) **श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी कंपनी व्यवस्थापनाला अनेक शुभेच्छा देतो. औद्योगिकीकरणाचे समर्थन करणारा मी पहिला पर्यावरणवादी आहे. सद्य:स्थितीमध्ये बेरोजगारीचे प्रमाण हे सर्वात मोठे प्रदूषण आहे. अंदाजे दरवर्षी १ कोटी विद्यार्थी त्यांचे शिक्षण पूर्ण करून नौकरीसंदर्भात बाहेर पडतात. ९५ टक्के नागरीक नौकरीवर अवलंबून असतात. माझी कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांच्या या प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रदूषण होणार नाही याची खात्री करावी. त्याचप्रमाणे पाण्याचे संवर्धन करणे देखील गरजेचे आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन कसे करता येईल याकडे कंपनीने लक्ष द्यावे. कंपनीने फळझाडे लावण्याकडे लक्ष द्यावे. मी याबाबत माझे लेखी निवेदन सादर करणार आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

१२) **सौ. वैशाली बालाजी दरेकर, ग्रामपंचायत आटमुर्डी, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अस्तित्वात असलेल्या सनफ्लॅग कोळसा खाणीमुळे कोंढाळा आणि बेलगांव या गावांमध्ये पाण्याच्या टंचाईची | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, श्री सिमेंट लिमिटेडचा प्रस्तावित सिमेंट उद्योग या क्षेत्रात |

| | | |
|---|---|---|
| | समस्या निर्माण झालेली आहे. त्यासोबतच या ठिकाणी सिमेंट प्लांट प्रस्तावित आहे. कंपनी प्रशासन आर ओ प्लांट उभारण्याचे प्रस्तावित करत आहे परंतु या परिसरात पाण्याची उपलब्धता नसल्याने त्याचा काही उपयोग होणार नाही. कंपनीने सर्वप्रथम गावामध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे व त्यानंतर प्रकल्प कार्यान्वित करावा. सीएसआर निधी वाटप करताना कंपनीने सर्व गावांना प्रत्येकी रू. ८.० लक्ष रक्कम द्यावी जेणेकरून गावाची आर्थिक परिस्थिती उंचावणार. त्यामुळे गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा व इतर सुविधा उपलब्ध होतील. शाळेकरिता बसेस व इतर सुविधा पूरविण्यात यावी. आटमुर्डी, दहेगाव, येन्सा, बेलगांव या गावातील शेती अधिग्रहीत करून रोजगार देणार असल्याचे कंपनी म्हणत आहे. परंतु गावातील स्थानिकांना किती प्रमाणात रोजगार देणार आहात याबाबत माहिती देण्यात यावी. स्थानिक बेरोजगारांनाच नव्हे तर कंपनीने शेतमजुरांना देखील रोजगार उपलब्ध करून द्यावा. शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहीत केल्यानंतर त्यांच्याकडे शेतीतून उत्पन्न घेण्यासाठी कोणतेही पर्यायी साधन उपलब्ध नाही. जिल्ह्यातील एकही कंपनीने आश्वासनांची पूर्तता केलेली नाही. तरी कंपनीला विनंती आहे की त्यांनी गावात सोई सुविधा पूरविण्याबाबत लेखी आश्वासन द्यावे. कंपनीने शैक्षणिक, आरोग्य विषयक व इतर सुविधा पूरविण्याबाबत आश्वासन देत आहे. ग्रामपंचायत देखील सीएसआर निधी मिळाला असेल तरी स्थानिकांना याबाबत माहिती मिळत नाही. अस्तित्वात असलेल्या कंपनीकडून सन २००६ पासून सन २०२५ पर्यंत एकही विकासात्मक कार्य करण्यात आले नाही. कंपनीने वाहतूकीकरिता पर्यायी मार्गाची व्यवस्था करावी कारण अस्तित्वात असलेल्या रस्त्याची वहन क्षमता नसल्याने अवजड वाहतूकीमुळे रस्त्याची दुर्दशा होते. कंपनी स्थानिक नागरीकांची शेती अधिग्रहीत करू शकते तर पर्यायी रस्त्याचे बांधकाम का नाही करू शकत? आम्ही अवजड वाहतूक रोखून ठेवली तर कंपनीच्या व्यवस्थापनाकडून विनंती करण्यात येते की आजच्या दिवस वाहतूक होऊ द्या, दुसऱ्या दिवसापासून वाहतूक बंद करण्याचे आश्वासन देण्यात येते. कंपनीचे म्हणणे आहे की, कोंढाळा गावाचे ५ नागरीकांना रोजगार देणार व इतर गावातील बेरोजगारांना रोजगार देणार. माझी विनंती आहे | आल्यामुळे परिसराचा विकास होईल. प्रकल्प आल्यामुळे परिसरात छोटे-मोठे रोजगार उपलब्ध होतात. सिमेंट प्रकल्प आल्यामुळे बऱ्याच प्रमाणात अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होतील. खाण प्रकल्पामधून मोठ्या प्रमाणात राजस्व शासनाला मिळते. शासनातर्फे देखील विविध योजनांमार्फत त्याचा फायदा स्थानिकांना होतो. मे. श्री सिमेंट लि या उद्योगाच्या श्री सिमेंट फाऊंडेशनमार्फत सीएसआरच्या निधीचा वापर करण्यात येतो. त्याबाबत माहिती कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. आम्ही जेव्हा तुमच्या परिसरामध्ये प्रकल्प कार्यान्वित करतो तेव्हा स्थानिकांच्या सहभागाशिवाय प्रकल्प कार्यान्वित होऊ शकत नाही. सीएसआर निधीबाबत स्थानिकांकडून आवश्यक माहिती मागविण्यात येईल व त्यानूसारच सीएसआर निधीचा वापर करण्यात येईल. आजच्या जनसुनावणी स्थानिकांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद इतिवृत्तामध्ये घेण्यात येते व सदर इतिवृत्त पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या पर्यावरण मुल्यांकन समितीकडे सादर करण्यात येते. उदा. जर कंपनीने शाळेमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत वचन देते तेव्ही सदर समितीकडून त्याबाबत कंपनीकडून कालबद्ध कृती आराखडा मागविण्यात येतो व सदर वचन कसे पूर्ण करणार याबाबत विचारणा करण्यात येते. तसेच याबाबत किती निधीची तरतूद त्याबाबत लागणारा कालावधी याबाबत देखील माहिती विचारण्यात येते. पर्यावरणीय मंजूरी देताना सर्व बाबींचा समावेश करण्यात येतो. पर्यावरणीय मंजूरीमध्ये नमूद असलेल्या अटी व शर्तींचे प्रकल्पातर्फे पालन होत आहे किंवा कसे याबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक संचालकांद्वारे दर सहा महिन्यांमध्ये तपासणी करण्यात येते. तसेच त्याबाबतचे सर्व पुरावे देखील सादर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे जनसुनावणीदरम्यान देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता पूर्णपणे करण्यात येईल याबाबत स्थानिकांनी निश्चिंत राहावे. |

| | | |
|---|---|---|
| | की, कोंढाळा गावातील नागरीकांना १०० टक्के रोजगार देण्यात यावा. मी जिल्हा प्रशासनाकडे वारंवार सीएसआर निधीबाबात पाठपुरावा केला परंतु त्याबाबत काहीही उत्तर मिळाले नाही. कंपनीचे म्हणणे आहे की फक्त ३ गावांच्या नागरीकांना रोजगार देण्यात येईल. कंपनीने स्थानिकांची जमीन ३० लाख रूपये ते ५० लाख रूपयांमध्ये खरेदी केली. कंपनीमुळे ज्या शेतकऱ्यांचे नूकसान झाले आहे त्यांना कंपनीने नूकसान भरपाई द्यावी. गट ग्रामपंचायतींना निधी प्राप्त होत नाही. कंपनीच्या वाहतुकीसाठी स्वतंत्र रस्ता बांधण्यात यावा. कोंढाळा गाव दत्तक घ्यावे. केवळ तीन गावांनाच रोजगार का दिला जात आहे? | |

**१३) <u>श्री. प्रविण पांडुरंग देवतळे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीतर्फे स्थानिकांना प्रकल्पामध्ये कायमस्वरूपी रोजगार देणार आहात काय? कंपनीने शेती अधिग्रहीत करताना स्थानिकांना आश्वासन दिले होत की प्रकल्पामध्ये कायस्वरूपी रोजगार देण्यात येईल. याबाबत लेखी आश्वासन देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये आपण उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात येते व त्यावर पर्यावरण विषयक जनसुनावणी समितीच्या स्वाक्षऱ्या होऊन पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात येते. तसेच जनसुनावणीचे छायाचित्रीकरण देखील करण्यात येत आहे. प्रकल्पांमध्ये नौकरी देण्याची एक मर्यादा असते. एक कंपनी हजारो स्थानिकांना रोजगार देऊ शकत नाही.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनी प्रशासनाने किती टक्के स्थानिकांना रोजगार देणार याबाबत माहिती द्यावी.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रकल्पामध्ये एकूण ८०० लोकांना नौकरी देण्यात येईल. त्यापैकी ३०० कायमस्वरूपी असतील व ५०० कंत्राटी स्वरूपाच्या असतली. त्यामध्ये स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हता, अनुभव व |

| | | |
|---|---|---|
| | | कौशल्याचे अवलोकन करून रोजगारात प्रथम प्राधान्य देण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तकांनी या क्षेत्रामध्ये कौशल्य विकास केंद्र उपलब्ध करून द्यावे जेणेकरून स्थानिकांमध्ये कौशल्याचे विकास करून त्यांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. तसेच कंपनीने पात्र उमेदवारांची छाननी करून त्यांच्यात कौशल्याचा विकास करावा. कंपनीने आजपासूनच कौशल्य विकासबाबत योग्य त्या उपाययोजना कराव्या. |

## १४) श्री. स्वप्निल उत्तम चिकटे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोंढाळा गावातील प्रत्येक व्यक्तीचा १०० टक्के आरोग्य विमा कंपनीकडून काढण्यात यावा. प्राथमिक उपचार केंद्र कोंढाळा गावामध्ये उभारणे, दरमहा मोफत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, मोबाईल हेल्थ व्हॅन, प्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांसाठी विशेष उपचार, गावात आरोग्य केंद्र/औषधोपचार सुविधा, प्रौढ पुरूष व महिलांसाठी दर महिन्याला मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात यावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## १५) श्री. लक्ष्मण बापुरव साळवे, निमसडा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रस्तावित प्रकल्पामध्ये अपंग/दिव्यांग व्यक्तिंना रोजगार मिळणार काय? दिव्यांग व्यक्तिंना रोजगाराच्या संधी देण्यात याव्या. कंपनीमुळे दिव्यांग व्यक्तिंना रोजगार मिळाल्यास त्यांच्या उपजिविकेचा प्रश्न सुटणार. गावातील ज्या व्यक्तिंच्या जमीनी अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत फक्त त्यांनाच रोजगार मिळणार काय? उर्वरित नागरीकांना रोजगार मिळणार किंवा कसे याबाबत माहिती | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | देण्यात यावी. परिसरातील १० गावातील सर्व दिव्यांग व्यक्तिंना रोजगार देण्यात यावा. | |

१६) **श्री. नंदलाल टेमुर्डे, सरपंच, ग्रामपंचायत मोहबाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने शेतकरी व शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर यांना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच रस्त्यालगत असणाऱ्या शेतीचे नूकसान झाल्यास त्या शेतकऱ्यांना योग्य ती नूकसान भरपाई देण्याची हमी कंपनीने द्यावी. कंपनीने परिसरातील प्रकल्पग्रस्त १० गावांमध्ये विद्यार्थ्यांकरिता बसची व्यवस्था तसेच इतर शैक्षणिक सुविधा पूरवाव्या. तसेच कंपनीने स्थानिक युवकांसाठी कौशल्य विकास केंद्र उभारून त्यांच्या कौशल्याचा विकास करावा व त्यांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. माझा या प्रकल्पाला पाठींबा आहे. प्रकल्प आल्यामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल व परिसरातील गावांचा विकास होणार अशी मला आशा आहे. जमीन गमावलेल्या व्यक्तींना रोजगार द्यावा. पिकांच्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना वार्षिक नुकसानभरपाई द्यावी. शाळा, बससेवा, शिक्षण व प्रशिक्षण केंद्र अशा मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

१७) **श्री. गणेश सूर्यभान काळे, ग्रामपंचायत सदस्य, निमसडा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने स्थानिक शेतकऱ्यांसोबत वैयक्तिकरीत्या संपर्क साधून त्यांच्या जमीनी अधिग्रहीत केले. जमीन अधिग्रहीत करताना शेतकऱ्यांना रोजगाराबाबत व सीएसआर निधीच्या माध्यमातून गावांचा विकास करण्याबाबत तोंडी आश्वासन आले असून ते लेखी स्वरूपात देणे अपेक्षित आहे. परिसरात जीएमआर व आणखी एक प्रकल्प कार्यान्वित आहे. मा. जिल्हाधिकारी यांनी सन १९९३ चा निवाळा केला व दि. २६ जुलै रोजी आदेश पारित केले. नकाशानूसार परिसराची पाहणी करण्यात आली व सर्व जमीन संपादित करण्यात आली. परंतु त्यामध्ये आम्ही ८- | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | १० लोक आहोत ज्यांना त्यामध्ये एकही रूपयाचा मोबदला मिळाला नाही. कंपनी प्रशासन गावकऱ्यांसोबत गोड बोलून त्यांची कामे साधून घेता व नंतर जनसुनावणीमध्ये आम्ही दिलेल्या आश्वासनानंतर गावकऱ्यांचे काहीही ऐकणार नाही असे कंपनीचे धोरण असते. मागील ९-१० वर्षांपासून आम्ही लढा देत आहोत परंतु आम्हाला त्याचा काहीही मोबदला मिळाला नाही. कंपनी कधीच ८-१० हजार झाडे लावत नाहीत. परिसरातील प्रदूषण कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीची आवश्यकता असताना देखील ते करण्यात येत नाही. कंपनी सुरू करण्यापूर्वी कंपनीने त्यांना लागणाऱ्या सुविधा पूरवायला पाहिजे. कोंढाळा व निमसडा गावाचा रस्ता कंपनीने वापरू नये. प्लांट सुरू करण्यापूर्वी कंपनीने त्यांच्या वाहतूकीकरिता पर्यायी रस्त्याची सोय करावी व त्यानंतरच प्लांट सुरू करावा. तसेच सर्व ग्रामस्थांना लेखी आश्वासन देण्यात यावे. आमच्या गावाला सीएसआर (CSR) अंतर्गत निधी उपलब्ध करून द्यावा. पर्यावरणविषयक समस्या तातडीने सोडवाव्यात. त्याबाबत लेखी हमी द्यावी. आम्हाला अद्याप कोणतीही नुकसानभरपाई प्राप्त झालेली नाही. वृक्षारोपण करण्यात यावे. कंपनीच्या वाहनांसाठी स्वतंत्र रस्ता बांधण्यात यावा. कोंढाळा व निमसडा गावांचा रस्ता कंपनीच्या वाहतुकीसाठी वापरू नये. | |

१८) **<u>श्री. जगदीश खिरटकर, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सामाजिक दायित्व या सदराखाली शालेय विद्यार्थ्यांना वरोरा येथे शिक्षण घेण्याकरिता मोफत बस सेवा उपलब्ध करून द्यावी. कोंढाळा गावात सार्वजनिक कार्यक्रमास आर्थिक सहायता निधी उपलब्ध करून द्यावा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

१९) **श्रीमती चंदा धानोरकर, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महिला बचतगटांसाठी व्यायसायिक प्रशिक्षण (शिवणकाम, शेळीपालन, दुग्ध व्यवसाय, ब्युटी पार्लर, इ.) कर्ज व अनुदान यासाठी मार्गदर्शन शिबीर राबवावे. महिला बचत गटांना आवश्यक ती आर्थिक व संस्थात्मक मदत उपलब्ध करून द्यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२०) **श्री. पवन लालसरे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जिल्हा परिषद व अंगणवाडी डिजिटल शाळा तयार करणे, दरवर्षी विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, युनिफॉर्म, स्कूल बॅग, स्टेशनरी यांचे मोफत वाटप कंपनीने केले पाहिजे. शालेय व गरीब विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, १० वी व १२ वी नंतर इंजिनिअरींग, मेडीकल, आयटीआय, डिप्लोमा, कॉलेज शिक्षणासाठी कंपनीने आर्थिक सहाय्य कंपनीने दिले पाहिजे. संगणक शिक्षण केंद्र किंवा डिजीटल लॅब उभारणे, विद्यार्थ्यांना फ्री इंटरनेट, कंप्युटर वापरण्याचे प्रशिक्षण, सार्वजनिक वाचनालय उभारणे करिअर मार्गदर्शन व स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण कंपनीतर्फे देण्यात यावे. तसेच UPSC, MPSC, NEET, JEE, पोलिस भरती, लष्कर भरती इत्यादीसाठी मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन कंपनीने करावे. तसेच नोकरीसाठी तयारी करण्याऱ्यांसाठी पुस्तके व कोचिंग सुविधा उपलब्ध करूण देण्याची गावातील युवकांतर्फे मागणी करण्यात येत आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२१) **श्री. मंगेश सुरेश चिकटे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गावामध्ये समुदाय भवन, क्रिडांगण, रस्ते, पाणी, वीज, स्वच्छता, स्ट्रीट लाईट इत्यादी सुविधा व सार्वजनिक शौचालये, पथदिवे, शाळा, मंदिरे व्यायामशाळा इत्यादी | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | मूलभूत सुविधा उभारण्यास कंपनीने प्राधान्य द्यावे अशी माझी मागणी आहे. | |

## २२) श्री. तारानाथ गजानन खिरटकर, उप-सरपंच, ग्रामपंचायत डोंगरगाव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी स्थानिक नागरीक, सरपंच, उप-सरपंच व इतर पदाधिकाऱ्यांनी लेखी व तोंडी स्वरूपात निवेदन दिले आहे. स्थानिकांनी परिसरातील अस्तित्वात असलेल्या उद्योगांबाबतचे त्यांचे अनुभव या जनसुनावणीदरम्यान कंपनी प्रशासनापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. मला हे जाणून घ्यायचे आहे की कंपनी प्रशासनापर्यंत स्थानिकांच्या मागण्या पोहोचल्या किंवा कसे. आटमुर्डी गावाच्या सरपंचांनी कंपनीच्या जमीन अधिग्रहणावर बोट ठेवले. कंपनीने प्रकल्पाकरिता लागणारी जमीन कोणत्या नियमानूसार अधिग्रहीत केली. या परिसरामध्ये शासनातर्फे बरेच प्रकल्प प्रस्तावित आहेत व त्यामुळे खाजगीकरण देखील होणार आहे. रेल्वे प्रशासनातर्फे मार्ग विस्तारीकरण करताना जमीनी अधिग्रहीत करताना जमीन अधिग्रहण कायद्यानूसार जमीनीच्या दराच्या ५ पटीने म्हणजेच रू. ८.० लाख प्रमाणे मोबदला देण्यात आला. मे. श्री सिमेंट उद्योगाने सुरूवातीला जमीन अधिग्रहीत करताना रू. २० लाख प्रमाणे दर आकारला व त्यानंतर जमीनीचा दर रू. ५०.० लाखापर्यंत गेला. स्थानिकांना त्यांच्या जमीनीच्या दराची कल्पना आहे. जमीनीच्या दरामध्ये फरक का करण्यात आला याची माहिती कंपनी प्रशासनाने द्यावी. परिसरातील काही कंपन्यांनी स्थानिकांच्या जमीनीवर बांधकाम केले असून त्याबाबत न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत व प्रकरण न्यायप्रविष्ट आहेत. ब्लास्टींग शेतीपासून किती अंतरावर करायला पाहिजे याबाबत माहिती देण्यात यावी. ब्लास्टींगबाबत नियमावलीचे पालन करण्यात यावे. सन २००६-०७ पासून बेलगांव खाणीबाबत खटले न्यायप्रविष्ट आहेत परंतु त्याबाबत आजपर्यंत निकाल प्रलंबित आहेत. त्या काळापासून स्थानिक शेतकरी त्याच्या जमीनीपासून मुकला आहे. जीएमआर व वर्धा पॉवर या कंपन्यांविरोधात देखील प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. याबाबत जिल्हा | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांच्या मागण्यांबाबत कंपनीप्रशासनातर्फे पूर्णपणे विचार करण्यात येत आहे. स्थानिकांचे सहकार्य घेऊनच कंपनीला पुढे काम करावयाचे आहे.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, मे. श्री सिमेंट या कंपनीने शेतकऱ्यांसोबत वाटाघाटी करून जमीन अधिग्रहीत केलेली आहे. शेतकऱ्यांनी जमीन अधिग्रहीत करण्यास नकार दिला असल्यास त्या ठिकाणी शासनातर्फे जमीन अधिग्रहण कायद्याअंतर्गत जमीन अधिग्रहीत करण्यात आली असती व शासनाचे नियम लागू झाले असते. सुरूवातीला जमीन अधिग्रहीत करताना काही शेतकरी २० लाख रूपयाला जमीन देण्यास तयार झाले असतील तसेच काही शेतकऱ्यांना जास्त जमीनीचा दर हवा असेल व त्याकरिता नंतर कंपनी व शेतकऱ्यांमध्ये चर्चा झाल्यानंतर जास्त दराने जमीन अधिग्रहीत करण्यात आली असेल.<br><br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, सदर जनसुनावणीचे छायाचित्रीकरण करण्यात येत असून त्याचे इतिवृत्त देखील तयार करण्यात येणार आहे. आपणांस कंपनीकडून काय अपेक्षित आहे याबाबत विचारणा करावी. |

| | |
|---|---|
| | प्रशासन व कंपनीने स्पष्टीकरण द्यावे. कंपनी प्रशासनाचे म्हणणे आहे की स्थानिकांसोबत चर्चा करून गावांमध्ये सीएसआर मार्फत विकास कामे करण्यात येणार आहे. स्थानिकांना अस्तित्वात असलेल्या कंपन्याकडून आलेल्या अनुभवाच्या आधारावर कंपनीने लेखी आश्वासन द्यावे. कंपनी सुरू झाल्यानंतर कंपनीमध्ये कोणालाही प्रवेश देण्यात येत नाही. स्थानिक नागरीक त्यांच्या अडचणी व समस्यांसाठी कंपनी प्रशासनाकडे गेल्यास त्यांचे म्हणणे ऐकले जात नाही. सदर जनसुनावणीदरम्यान नोंद घेतलेल्या मुद्यांचे किंवा ध्वनिचित्रीकरण केल्यानंतर संबंधित २० ग्रामपंचायतींमध्ये सीएसआर मार्फत कंपनीतर्फे करण्यात येणाऱ्या विकास कामांचे दृश्यरूप कल्पना करून अंमलबजावणी करावी. कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी स्थानिकांच्या मागण्या पूर्ण कराव्या व सीएसआर मार्फत विकासकामे करावी. | |

## २३) श्री. एकनाथ शंकर धानोरकर, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खाणीच्या आजूबाजूच्या शेतात असलेल्या शेतकऱ्यांच्या पिकाचे कोणतेही नूकसान होणार नाही याची योग्य ती काळजी घ्यावी आणि जर काही नूकसान झाले तर कंपनीने संबंधित शेतकऱ्याला शासकीय मुल्यांकन नूसार किंवा उत्पादनाच्या ७५ टक्के नूकसान भरपाई द्यावी. रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या शेतात धुळीमुळे पिकांचे कोणतेही नूकसान होणार नाही याची काळजी कंपनीकडून घेतली जावी. जर काही नूकसान झाले असेल तर संबंधित शेतकऱ्याचे नूकसान कंपनीने भरून काढले जावे व कंपनीमुळे जलसाठा कमी झाल्यास शेतीच्या जलसिंचनाकरिता पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२४) **श्री. विशाल नानाजी पारखी, सरपंच, ग्रामपंचायत दहेगाव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने कोंढाळा, निमसडा, दहेगाव या भागातील शेतजमीनी ज्या दरांमध्ये घेतली २५ लाख, ५० लाख किंवा १ कोटी, २ कोटी मध्ये घेतली असेल. परंतु शेतकऱ्यांनी इतक्या मोठ्या प्रमाणात पेसा कधी पाहिलेला नाही व त्याचे नियोजन कसे करायचे याबाबत देखील त्यांना ज्ञान नाही. शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात रक्कम आल्यामुळे त्यांना आयकर विभागाकडून नोटीस प्राप्त झाल्यास त्याची जबाबदारी कंपनी घेणार काय याबाबत माहिती देण्यात यावी. सदर रक्कम कंपनीकडून चेकद्वारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे. नियमानूसार शेतीच्या उत्पन्नाला कर लावण्यात येत नाही. कारण काही स्थानिकांना इतक्या मोठ्या रकमेमुळे आयकर विभागाकडून नोटीस प्राप्त झालेल्या आहेत. बेलगांवच्या सरपंचांनी उपस्थित केल्याप्रमाणे या परिसरातील १०-१२ कि.मी. क्षेत्रात पाण्याची समस्या अस्तित्वात आहे. खाणकामामुळे परिसरात पाण्याच्या पातळीमध्ये घट होणार आहे. या प्रस्तावित कंपनीकरिता पाणी वर्धा नदीतून उचलण्यात येणार आहे. ज्या गावांमध्ये पाण्याची टंचाई आहे त्या गावांमध्ये बोरवेल न उभारता पाणी उपलब्ध करून द्यावे. टँकरच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करून देण्यात येऊ नये. कंपनीला ज्या पाईपलाईनद्वारे पाणी उपलब्ध होणार आहे त्याच पाईपलाईनद्वारे गावांमध्ये देखील पाणी उपलब्ध करून देण्यात यावे. कंपनीच्या प्रदूषणामुळे जवळपास १०-१२ कि.मी. अंतरापर्यंत गावांमध्ये पर्यावरणाचा ऱ्हास होणार आहे. कंपनीने कितीही अद्यावत प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविल्यानंतर देखील परिसरातील तापमानामध्ये वाढ होणार आहे. कंपनीने सीएसआर अंतर्गत स्थानिकांच्या भल्यासाठी कामे करावी. तसेच परिसरातील गावांमध्ये कमीतकमी प्रमाणात प्रदूषण होईल याची देखील कंपनीने काळजी घ्यावी. शेतकऱ्यांना भविष्यात दंड भरावे लागले तर त्यांच्याकडे स्वतःचे मुत्रपिंड विकण्याशिवाय पर्याय उपलब्ध राहणार नाही. तसेच विक्रीपत्रामध्ये बिनशेती जागेचा उल्लेख करण्यात आला आहे व सदर जागा चौरस मीटर नूसार खरेदी | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, शेतकऱ्यांना आयकर विभागाकडून येत असलेल्या नोटीसीबाबत कंपनी प्रशासनासोबत चर्चा करून काही मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक आयकर विभागाकडून शेतकऱ्यांना लावण्यात येणाऱ्या दंडाची रक्कम भरणार किंवा कसे याबाबत उत्तर देण्यास सांगितले. तसेच याबाबत कंपनीचे धोरण काय असेल याबाबत देखील माहिती देण्यास सांगितले.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या वतीने कंपनी कोणत्याही प्रकारची दंडाची रक्कम भरणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| | केल्याचे विक्रीपत्रात नमूद आहे. शेतकऱ्यांना आयकर विभागाकडून लागणाऱ्या दंडाची रक्कम कंपनी भरणार काय? शेतकरी निरक्षर असल्याने त्याला आयकर विभागाच्या नियमांचे ज्ञान नाही. त्यामुळे भविष्यात शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय उपलब्ध राहणार नाही. जर कंपनीकडे याबाबतचे उत्तर नसल्यास शेतकऱ्यांना आयकर विभागाकडून दंड आकारण्यात येणार असून तो शेतकऱ्यांनी भरावाच लागेल असे समजायचे काय? म्हणजे कंपनीने शेतकऱ्यांसोबत काही कट कारस्थान व धोखाधडी करून त्यांच्या जमीनी अधिग्रहीत केल्या आहेत असे समजायचे काय? शेतकऱ्यांनी त्यांना आयकर विभागाकडून प्राप्त दंडाची रक्कम भरावयाची असल्यास त्यांना शरीराचे अंग विकावे लागणार किंवा आत्महत्या करावी लागणार. कंपनीने शेतकऱ्यांच्या वतीने आयकर विभागाच्या दंडाची रक्कम भरणे अपेक्षित आहे. तसे न झाल्यास शेतकऱ्यांतर्फे कंपनीच्या मख्य प्रवेशद्वारावर आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही. | |

## २५) श्री. विजय नामदेव देवतळे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीतर्फे जमीन खरेदी करण्याबाबत कोणत्याही प्रकारची सुचना महसूल विभाग व कंपनीकडून देण्यात आलेली नाही. कंपनीने शेतकऱ्यांसोबत वाटाघाटी करताना त्यांची दिशाभूल केलेली आहे. तसेच कंपनीने याबाबत कोणत्याही प्रकारची बैठक घेतलेली नाही. याबाबत कंपनीने माहिती द्यावी. काही आदिवासी शेतकऱ्यांची जमीन कमी किमतीमध्ये अधिग्रहीत करण्यात आली आहे व काही शेतकऱ्यांची जमीन रू. ३७ लाख मध्ये घेण्यात आली आहे. कंपनीने शेतकऱ्यांची दिशाभूल करून जमीन अधिग्रहीत केलेली आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पाकरिता शेतकऱ्यांची चर्चा करूनच जमीनी अधिग्रहीत करण्यात आली आहे.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

२६) **श्री. रामा भद्रुजी बोढाणे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने जमीन रू. २९ लाख, रू. ३० लाख, रू. ३५ लाख, रू. ४० लाख याप्रमाणे विकत घेतलेली आहे. परंतु जनुसनावणीदरम्यान प्रश्नांचे समाधानकारक उत्तरे देण्यास कंपनी असमर्थ असल्याचे दिसत आहे. कंपनीने जमीन अधिग्रहण करताना ग्रामसभा घेणे अपेक्षित होते परंतु ग्रामसभा घेण्यात आली नाही. शेतकऱ्यांना कंपनीतर्फे ज्यादा दराचे आश्वासन देऊन जमीन घेण्यात आली आहे. कोंढाळा गावातील १०० टक्के युवक व युवतींना कंपनीमध्ये कायमस्वरूपी रोजगार मिळावा. याबाबत कंपनीने लेखी आश्वासन द्यावे. कंपनी प्रशासन कोंढाळा गावातील युवक व युवतींना १०० टक्के रोजगार का नाही देऊ शकत. गावाचे पुनर्वसन होणार आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. ज्या नागरीकांकडे जमीनी नाहीत त्यांचे काय होणार? नवी दिल्ली सारख्या मोठ्या शहराच्या प्रदूषणाकडे शासन दुर्लक्ष करत आहे तर कोंढाळा सारख्या छोट्या गावाच्या प्रदूषणाकडे कोण लक्ष देणार. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, जनसुनावणीदरम्यान उपस्थित मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे. आपल्या सर्व प्रश्नांची कंपनी प्रशासनातर्फे उत्तरे देण्यात येणार आहेत.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, रोजगारामध्ये स्थानिकांना प्राथमिकता देण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनीने गावातील बेरोजगारांबाबत सर्वेक्षण करावे. तसेच सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनूसार कुशल विद्यार्थ्यांना कंपनीमध्ये रोजगार द्यावा. तसेच अकुशल विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याचा विकास करण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र उभारावे व अकुशल विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याचा विकास करून रोजगाराच्या संधी द्यावी. तसेच सीएसआर निधीकरिता परिसरातील प्रकल्पग्रस्त गावांमधील लोकप्रतिनिधी व कंपनी यांची एक समिती स्थापन करून सीएसआर निधीच्या माध्यमातून गावामध्ये सुविधा पूरविण्यात याव्या.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पामध्ये एकूण ८०० कामगारांची गरज असणार आहे. त्यापैकी ३०० कायमस्वरूपी व ५०० कंत्राटी तत्त्वावर असणार आहेत. तसेच स्थानिक युवक व युवतींमध्ये कौशल्याचा विकास करण्यासाठी कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येईल. तसेच कौशल्याचा विकास करून त्यांना रोजगार देण्यात येईल व स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहीत करण्यात येईल. कंपनीने घेतलेल्या जमीनीमध्ये पुनर्वसन नमूद नाही. सदर प्रकल्पामुळे कोणतेही घर विस्थापित होत नाही आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सीएसआर निधीबाबत स्थानिकांकडून आवश्यक माहिती मागविण्यात येईल व त्यानूसारच सीएसआर निधीचा वापर करण्यात येईल. आजच्या जनसुनावणी स्थानिकांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद इतिवृत्तामध्ये घेण्यात येते व सदर इतिवृत्त पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या पर्यावरण मुल्यांकन समितीकडे सादर करण्यात येते. उदा. जर कंपनीने शाळेमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत वचन देते तेव्हा सदर समितीकडून त्याबाबत कंपनीकडून कालबद्ध कृती आराखडा मागविण्यात येतो व सदर वचन कसे पूर्ण करणार याबाबत विचारणा करण्यात येते. तसेच याबाबत किती निधीची तरतूद त्याबाबत लागणारा कालावधी याबाबत देखील माहिती विचारण्यात येते. पर्यावरणीय मंजूरी देताना सर्व बाबींचा समावेश करण्यात येतो. पर्यावरणीय मंजूरीमध्ये नमूद असलेल्या अटी व शर्तीचे प्रकल्पातर्फे पालन होत आहे किंवा कसे याबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक संचालकांद्वारे दर सहा महिन्यांमध्ये तपासणी करण्यात येते. तसेच त्याबाबतचे सर्व पुरावे देखील सादर करणे बंधनकारक आहे. मंत्रालयाला काही त्रुट्या आढळल्यास उद्योग बंद करण्याचे आदेश देखील देण्यात येते. त्यामुळे जनसुनावणीदरम्यान देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता पूर्णपणे करण्यात येईल याबाबत स्थानिकांनी निश्चिंत राहावे. |

२७) **श्री. मनोज चिडे, निमसडा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आतापर्यंत कंपनीने किती जमीन संपादित केली आहे व भविष्यात किती जमीन संपादित करण्याचे प्रस्तावित आहे याची माहिती देण्यात यावे. ब्लासटींगमुळे परिसरातील घरांना तडे गेल्यास कंपनीकडून नूकसान भरपाई देण्यात यावी. कोंढाळा प्रमाणे निमसडा गावातील बेरोजगारांना | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, मा. अध्यक्षांनी सांगितल्याप्रमाणे गावामध्ये सर्वेक्षण करण्यात येईल व स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतूनेसार रोजगार देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीमध्ये १०० टक्के रोजगार देण्यात यावा. रोजगाराबाबतचा सर्व सरपंचांच्या माध्यमातून न होता ग्रामसभेच्या माध्यमातून करण्यात यावा. | |

## २८) श्री. अनिकेत शंकर गाडे, निमसडा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने स्थानिक महिलांना देखील रोजगारामध्ये प्राधान्य द्यावे. जेणेकरून त्यांच्या उदर्निर्वाहाचा प्रश्न सुटेल. खरेदी करण्यात आलेली जमीन सुमारे ८०० एकर असून त्या क्षेत्रात कोणतीही शेती होणार नाही. परिणामी महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार नाहीत. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनीने गावातील बेरोजगारांबाबात सर्वेक्षण करावे. तसेच सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनूसार कुशल विद्यार्थ्यांना कंपनीमध्ये रोजगार द्यावा. तसेच अकुशल विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याचा विकास करण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र उभारावे व अकुशल विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याचा विकास करून रोजगाराच्या संधी द्यावी. त्यामध्ये महिलांचा देखील समावेश करण्यात यावा. |

## २९) श्री. हर्षद आवारी, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोंढाळा गावातील सुशिक्षित बेरोजगारांना कायमस्वरूपी रोजगार कंपनीने द्यावा. कोंढाळा गावाचे पुनर्वसन का होत नाही याचे कारण सांगावे. कोंढाळा गावात कंपनी चालू होत आहे. तरी त्यातील निघणारा प्रोडक्टची Distribution या सेलिंग कमतीकमी सीटी या विभागातील प्राधान्य कोंढाळा गावातील ग्रामवासीयांना द्यावे. कोंढाळा गावात सिमेंट कंपनी चालू होत आहे तेथील छोटे-मोठे निघणारे टेंडर जसे सिव्हील, ट्रान्स्पोर्ट, लेबर सप्लायर, कॅन्टीन, वाटर सप्लायर, हाऊसकीपींग इत्यादीचे प्राधान्य सर्वप्रथम कोंढाळा येथील ग्रामवासीयांना द्यावे ही विनंती. कंपनी बनायला लागणारे छोटे-मोठे मटेरियल सप्लाय करण्याचे सर्वप्रथम प्राधान्य कोंढाळा गावातील जे गावकरी करण्यात इच्छुक असेल त्यांना पहिले प्राधान्य द्यावे. सिमेंट प्रोडक्टचे कोणत्याही २ | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनीतील छोटे-मोठे निघणारे टेंडर जसे सिव्हील, ट्रान्स्पोर्ट, लेबर सप्लायर, कॅन्टीन, वाटर सप्लायर, हाऊसकीपींग इत्यादीचे प्राधान्य सर्वप्रथम कोंढाळा येथील ग्रामवासीयांना द्यावे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मा. अध्यक्षांनी दिलेल्या सुचनांचे पालन करण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच कंपनीचे ओपन टेंडरद्वारे काम देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | सिटीमध्ये गोडाऊन स्टॉकेजचे प्राधान्य गावकऱ्यांना द्यावे. कोंढाहा गावाचे पुनर्वसन करण्यात यावे. | |

## ३०) श्री. ए.एस.गाडे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | स्थानिक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. कौशल्य विकास केंद्राची उभारणी करावी. लहान स्वरूपाच्या कामांची कंत्राटे स्थानिक नागरिकांना द्यावीत. प्रभावित गावांचे पुनर्वसन करण्यात यावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ३१) श्री. ईश्वर देवतळे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रदूषण टाळण्यासाठी आणि परिसरात पर्यावरणाचा समातोल राखण्यासाठी आवश्यक ती खबरदारी कंपनीकडून घेण्यात यावी. तसेच मनुष्य, पाळीव प्राणी, पक्षी यांचे कोणतेही नूकसान होणार नाही आणि कोणत्याही मानवी जीवाचे नूकसाप होणार नाही याची कंपनीकडून खबरदारी घ्यावी. कंपनीने प्रदूषण टाळण्यासाठी पक्के उपाये करावे (जसे की सांडपाणी व्यवस्थापन, ध्वनी/वायु प्रदूषण नियंत्रण). ग्रामस्थांशी चर्चा करून पर्यावरणाबाबत सहकार्य करणे व वन-जमीनीवरील जे शेतकरी शेती करत आहे, भविष्यात त्यांची जमीन संपादित करावयाचे असल्यास त्या जमीनीवरील धारकास योग्य मोबदला देण्यात यावा. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनीतील छोटे-मोठे निघणारे टेंडर जसे सिव्हील, ट्रान्स्पोर्ट, लेबर सप्लायर, कॅन्टीन, वाटर सप्लायर, हाऊसकीपींग इत्यादीचे प्राधान्य सर्वप्रथम कोंढाळा येथील ग्रामवासीयांना द्यावे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मा. अध्यक्षांनी दिलेल्या सुचनांचे पालन करण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच कंपनीचे ओपन टेंडरद्वारे काम देण्यात येईल. |

## ३२) श्री. हरीदास भुते, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने परिसरातील जमीन अधिग्रहीत केल्यामुळे शेतीचे उत्पादन घटले आहे. शेतकऱ्यांनी आधुनिक शेती कशी करावी, उत्पादन कसे वाढवावे याकरिता कंपनीने कृषी तज्ञांची कार्यशाळा घ्यावी. जेणेकरून शेतीचे उत्पन्न | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | वाढविण्यास मदत होईल. शेतीपूरक व्यवसायासाठी मदत करावी ज्यामध्ये दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, मधमाशी पालन, फळ प्रक्रिया यामध्ये प्रशिक्षण व भांडवलाची गुंतवणूक तसेच वर्षातून एकदा कृषी सहल नेण्यात यावी. प्रगत शेतीविषयक प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे. | |

## ३३) श्रीमती जयश्री चौधरी, सरपंच, ग्रामपंचायत निमसडा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने शासनाच्या नियमानूसार भविष्याक जमीनीचे अधिग्रहण करावे. तसेच आयकर विभागाच्या नोटीसीबाबत कंपनीने त्यांच्या सनदी लेखापाल किंवा कायदे तज्ज्ञांशी चर्चा करून तोडगा काढावा व भविष्यात या बाबत योग्य ती कार्यवाही करावी. तसेच शेतीच्या जागेच्या विक्रीवर आयकर लागणार नाही याची काळजी घ्यावी. कंपनी प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर त्यांच्या नफ्यातून सीएसआर निधीचा वापर करून गावाचा विकास करणार आहे. पर्यावरणाचे कितीही संवर्धन केले तरी नैसर्गिक स्त्रोत एकदा खराबा झाला तर तो पूर्ववत होत नाही. जमीनीमध्ये पाण्याची पातळी कशी वाढवता येईल याकडे कंपनीने लक्ष द्यावे. सीएसआर निधीच्या माध्यमातून या प्रकारची कामे अधोरेखीत असतातच. कंपनीतून निघणाऱ्या वेस्ट मटेरियलचा पुनर्वापर कसा करता येईल याचे नियोजन करावे. सिमेंट खरेदी करताना ग्रामपंचायतींना सब्सिडी देण्यात यावी. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सार्वजनिक कामांसाठी सब्सिडी देता येईल किंवा कसे याबाबत कंपनी प्रशासनासोबत चर्चा करून त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करावा. |

## ३४) श्री. सुरेंद्र गोपाळराव देठे, बेलगांव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीतर्फे १० ग्रामपंचायतींमध्ये जनसुनावणीबाबत नोटीस देण्यात आली परंतु जमीन फक्त ०३ गावांमध्ये संपादित करण्यात आली. सीएसआर निधी या सर्व १० ग्रामपंचायतींना सरसकट देण्यात येणार किंवा त्यामध्ये ०३ गावांना जास्त व उर्वरित निधी राहिलेल्या ०७ ग्रामपंचायतींना देणार याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सार्वजनिक कामांसाठी सब्सिडी देता येईल किंवा कसे याबाबत कंपनी प्रशासनासोबत चर्चा करून त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करावा. सीएसआर निधीबाबत सर्व प्रकल्पग्रस्त ग्रामपंचायतींसोबत चर्चा |

| | | |
|---|---|---|
| | सदर प्रकल्पाचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. तसेच कंपनीने कोणत्याही ग्रामपंचायतींमध्ये जमीन खरेदीबाबत नोटीस दिलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांवर कंपनीने अन्याय केलेला आहे. भविष्यात जमीन अधिग्रहण करण्यापूर्वी कंपनीने तलाठीमार्फत गावांमध्ये दवंडी पिटवून जमीन अधिग्रहणाबाबत पूर्वसूचना द्यावी जेणेकरून स्थानिकांना त्यांच्या जमीनीचा योग्य तो मोबदला मिळू शकणार. सीएसआर निधी सर्व १० ग्रामपंचायतींमध्ये कशा प्रकारे वितरीत करण्यात येणार आहे याबाबत माहिती देण्यात यावी. कंपनीचे प्रतिनिधी शहरामध्ये वास्तव्यास असणार असल्याने शहराचा विकास होईल. गावांचा विकास होणार नाही. लगतच्या परिसरात शासनाची खाण अस्तित्वात आहे. खाणीमुळे परिसरातील रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. आज भद्रावती मध्ये निप्पॉन डेन्ड्रो प्रकल्पाविरोधात स्थानिकांना आंदोलन करावे लागत आहे. तसेच गडचांदूर येथील सिमेंट फॅक्ट्री विरोधात देखील आंदोलन करावे लागत आहे. प्रकल्पग्रस्तांना फक्त आंदोलन करावे लागत आहे. त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात येत नाही. कंपनीला विनंती आहे की स्थानिक अकुशल नागरीकांना कौशल्य देऊन रोजगार निर्मिती करून द्यावी. प्लांट उभारायला किती वर्ष लागतील याची माहिती देण्यात यावी. तसेच प्लांट किती वर्षांसाठी कार्यरत असणार याची माहिती देण्यात यावी. प्लांटचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे हे नक्की आहे. त्याकरिता भविष्यात जमीनीचे अधिग्रहण करण्यात येणार आहे हे पक्क आहे. कोंढाळा, निमसडा येथे जमीन उत्खननावेळी करण्यात आलेल्या चुका परत करण्यात येऊ नये यासाठी हा मद्दा उपस्थित करण्यात येत आहे. श्री. विशाल पारखी यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानूसार शेतजमीनीची खरेदी विक्री करताना त्यावर आयकर लागायला नको होते. परंतु कंपनीने चौरस फुटाप्रमाणे जमीनीची खरेदी केली आहे म्हणजेच नियमांचे उल्लंघन करून जमीन खरेदी केली आहे. जमीन खरेदी करताना कंपनीने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. | करण्यात येईल व त्यानूसार सीएसआर निधीचे वाटप करण्यात येईल.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्लांट उभारायला जवळपास २-३ वर्षांचा कालावधी लागणार आहे. तसेच प्लांट जवळपास २५-३० वर्ष कार्यरत असणार आहे.<br><br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, कंपनीला पर्यावरण मुल्यांकन समितीसमोर आपण उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत उत्तर सादर करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय त्यांना पर्यावरणीय मंजूरी मिळणार नाही.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपण उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची इतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येत आहे तसेच छायाचित्रिकरण देखील करण्यात येत आहे. सदर ईतिवृत्तावर या जनसुनावणीच्या समितीच्या स्वाक्षऱ्या होऊन सदर ईतिवृत्त पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात येते. जनसुनावणीची समिती दिल्लीच्या समितीमध्ये समावेश होऊ शकत नाही कारण त्याचे अधिकार या समितीकडे नाही. परंतु आपण उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत उहापोह पर्यावरण मुल्यांकन समितीपुढे होतो. तसेच ईतिवृत्त प्रादेशिक व इंग्रजी भाषेमध्ये सादर करण्यात येतात. |

३५) **श्री. मारूती लटारूजी देवतळे, बेलगांव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गावामध्ये ग्रामसभा घेण्यात आली होती व त्यामध्ये सांगण्यात आले होते की ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले नाही. परंतु दि. २१/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये ना-हरकत प्रमाणपत्र आधीच देण्यात आले होते. त्या विरोधात आम्ही गट विकास अधिकारी यांचेकडे तक्रार दाखल केली होती परंतु त्या तक्रारीवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही. आम्ही कोंढाळा ग्रामस्थ आपल्याकडे नम्र निवेदन करीत आहोत की आपल्या श्री सिमेंट कंपनीमुळे परिसरात औद्योगिक विकास होत आहे. या विकासाचा लाभ स्थानिक नागरीकांना मिळावा या हेतूने खालील मागण्या मांडत आहोत. त्याबाबत कंपनीकडून स्पष्ट, लेखी व बंधनकारक हमी देणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील मागण्या लेखी स्वरूपात (कंपनीच्या लेटरहेडवर, अधिकृत स्वाक्षरी व शिक्क्यासह) देण्यात याव्यात. आम्हाला आमच्या खालील मागण्या मान्य असले तरच आमचा कंपनीला विरोध नाही अन्यथा आमच्या मागण्या मंजूर न झाल्यास आमचा कंपनीला विरोध आहे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, उपविभागीय अधिकारी याबाबत योग्य तो निर्णय घेतील. |

३६) **श्री. लक्ष्मणराव पारखी, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने वैयक्तिक स्तरावर शेतकऱ्यांसोबत संपर्क साधून जमीन अधिग्रहीत केल्या त्यामुळे शेतकऱ्यांना पाहिजे त्या दराने मोबदला मिळाला नाही. कोंढाळा गावाच्या शेतकऱ्यांना स्वस्त दरामध्ये इतर ठिकाणी जमीन मिळत नाही. कोंढाळा गावातील संपूर्ण जमीन कंपनी अधिग्रहीत करणार आहे किंवा कसे याबाबत कंपनीने माहिती द्यावी. कंपनीच्या प्रदूषणामुळे लगतच्या गावावर परिणाम होणार आहे. तसेच स्थानिक नागरीकांच्या आरोग्यावर देखील परिणाम होणार आहे. त्यामुळे कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी कोंढाळा गावातील संपूर्ण जमीन अधिग्रहीत करावी व कोंढाळा गावाचे पुनर्वसन करावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पाकरिता जेवढ्या जमीनीची आवश्यकता आहे तेवढी जमीन आम्ही अधिग्रहीत केलेली आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पाच्या विस्तारीकरणाचा प्रस्ताव नाही. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये प्रदूषण नियंत्रणाबाबतच्या उपाययोजनांचा समावेश आहे.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे व वारंवार उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत कंपनीला सर्वेक्षण करून त्याबाबत |

| | | |
|---|---|---|
| | तसेच जमीन अधिग्रहीत करताना सर्व गावकऱ्यांना समान दराने मोबदला देण्यात यावा त्यामध्ये कोणतीही तफावत असून नये. प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नूकसान होण्याची शक्यता आहे. कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणात नूकसान होऊन त्यास हमी भाव मिळणार नाही. कंपनीने जास्त दराने उर्वरित शेतकऱ्यांची शेतजमीन विकत घ्यावी जेणेकरून त्याच्या उदर्निर्वाहाचा मार्ग मोकळा होईल. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना व मुलींना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनूसार प्रकल्पामध्ये नौकरी देण्यात यावी. माझी प्रशासनाला देखील विनंती आहे की त्यांनी याबाबत कंपनीकडून कार्यवाही करून घ्यावी. तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावे. सदर प्रकल्प निमसडा, कोंढाळा व दहेगाव या गावांच्या मधोमध असल्यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांचे हित पाहून सैनिक शाळेची स्थापना या परिसरामध्ये करण्यात यावी. आपण नोटीस दिलेल्या सर्व १० ग्रामपंचायतींच्या परिसरामध्ये खुली व्यायामशाळा व बंदिस्त व्यायामशाळा उभारण्यात यावी. तसेच सर्व गावांमध्ये पायाभूत सुविधा पूरविण्यात याव्या. याबाबत प्रशासनाने लक्ष देऊन कंपनीकडून अंमलबजावणी करण्याबाबत कार्यवाही करून घ्यावी. कंपनीतर्फे सौर ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित आहे किंवा कसे याबाबत माहिती द्यावी. आतापर्यंत उपस्थित केलेल्या मुद्यांची प्रशासनाने नोंद घ्यावी व कंपनीने त्याची दखल घ्यावी अशी मी विनंती करतो. सैनिकी शाळेची स्थापना करण्यात यावी. | योग्य ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देखील देण्यात आलेल्या आहेत. त्यांनी ही सर्व कामे सीएसआर (CSR) निधीतून करण्याचे निर्देश दिले.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पामध्ये सौर ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित नाही. परंतु सौर ऊर्जा वापरण्यासाठी छतावर सोलर पॅनल बसविण्यात येतील. तसेच सीएसआरच्या माध्यमातून गावांमध्ये सौर ऊर्जेवर आधारित पथदिवे बसविण्यात येतील. |

**३७) श्री. विजय नामदेव देवतळे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने जवळपास १९ एकर शेती विकत घेतलेली असून आम्ही भूमिहीन झालेलो आहोत. तसेच बाहेर शेती कमी दराने मिळत नाही. याबाबत आम्ही पुढचा निर्णय कसा घ्यायचा. तसेच मोबदला देखील कमी मिळालेला आहे. कंपनीने गावकऱ्यांची फसवणूक केलेली आहे. शासनाच्या अधिकाऱ्यांनी जमीन अधिग्रहणाबाबत नोटीस किंवा प्रकल्पग्रस्त गावांमध्ये दवंडी पिटवून प्रचार करायला पाहिजे होते असे माझे मत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पाकरिता शेतकऱ्यांची जमीन त्यांच्यासोबत चर्चा करूनच जमीनी अधिग्रहीत करण्यात आली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारे मध्यस्थी करण्यात आली नाही.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

## ३८) श्री. विशाल नानाजी पारखी, सरपंच, ग्रामपंचायत देहेगाव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने ग्रामपंचायत येन्सा, कोंढाळा व देहेगाव या गावातील शेतीजमीनी औद्योगिक वापरासाठी खरेदी केलेली असून त्याचा कर कंपनी थेट ग्रामपंचायतींना देणार आहे की यामध्ये कोणी मध्यस्थी असणार आहे याबाबत माहिती देण्यात यावी. कंपनीने प्रकल्प सुरू केल्यानंतर परिसरातील भौगोलिक वातावरण खराब होणार असून परिसरामध्ये प्रदूषण होणार असल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ त्याबाबत कंपनीचे ऑडीट करणार आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. कंपनी सुरू झाल्यांतनर परिसरातील शेतकऱ्यांचे नूकसान होणार असून त्याची नूकसान भरपाई कंपनी देणार आहे किंवा कसे याबाबत देखील माहिती देण्यात यावी. माझी प्रदूषण नियंत्रण मंडळाला विनंती आहे की त्यांनी दरवर्षी स्थानिक शेतकऱ्यांची बैठक घेऊन शेतीच्या नूकसानीबाबत पाहणी करावी जेणेकरून परिसरातील शेतकऱ्यांचे नूकसान होणार नाही व कंपनीकडून नूकसान भरपाई देण्यात यावी. याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळ बैठकीची तारीख निश्चित करणार आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. तसेच गावातील नाले वळवण्यात येणार आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. कालव्याच्या वळणाबाबत सखोल अभ्यास करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कर थेट ग्रामपंचायतींना अदा करण्यात येईल. |

## ३९) श्री. गणेश काळे, सदस्य, ग्रामपंचायत निमसडा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज जनसुनावणीदरम्यान स्थानिकांचे सकारात्मक व नकारात्मक मत नोंदविण्यासाठी आपण येथे आले आहात. कंपनीने वाहतूकीकरिता पर्यायी रस्त्याची माहिती द्यावी तसेच याकरिता कोणत्या भागातील जमीनी अधिग्रहीत करणार आहे याची देखील माहिती द्यावी. तसेच भूसंपादन प्रक्रिया संपली किंवा आणखी जमीन अधिग्रहीत करण्यात येणार आहे याच उत्तर द्यावे. कारण नजिकच्या काळात शेतीचे हंगाम सुरू होणार आहे व | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | शेतकऱ्याने शेती सुरू केली व त्यानंतर कंपनी शेतजमीन अधिग्रहण करायला सुरूवात केली तर शेतकऱ्याचे उत्पन्न होणार नाही व त्याचे मोठ्या प्रमाणात नूकसान होईल. उपस्थित करण्यात आलेल्या सर्व मुद्यांचे लेखी आश्वासन देण्यात यावे. तसेच कंपनीमध्ये लागणाऱ्या मनुष्यबळाकरिता तारीख जाहीर करावी. कंपनीच्या वाहनांसाठी स्वतंत्र रस्ता बांधण्यात यावा. तसेच जनतेला कंपनीकडून लेखी उत्तर देण्यात यावे. | |

## ४०) श्री. लक्ष्मण बापुरव साळवे, निमसडा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे सांगण्यात आले की दिव्यांग व्यक्तिंसाठी ग्रामपंचायतीमध्ये निधीची तरतूद देणार असल्याचे सांगितले. सदर निधी लाभार्थ्यांना मिळत नाही. ग्रामसेवकांनी निधी वाटपादरम्यान भ्रष्टाचार केला. प्रकल्प प्रवर्तकांनी मला प्रकल्पामध्ये कायमस्वरूपी नौकरी देण्यात यावी. माझी पत्नी देखील मानसिक आजाराने ग्रस्त आहे. नौकरी मिळाल्यामुळे मी माझ्या पत्नीचा व्यवस्थित उपचार करू शकणार. मी जीएमआर या कंपनीमध्ये नौकरीबाबत प्रयत्न केले परंतु त्यांनी सपशेल नकार दिला. प्रकल्पामध्ये दिव्यांग व्यक्तिंना प्रथम प्राधान्य देण्यात यावा. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनीने त्यांच्या जनसंपर्क अधिकाऱ्यामार्फत प्रकल्पग्रस्त दिव्यांग व्यक्तिंसोबत संपर्क साधून त्यांची हेळसांड होणार नाही याची खबरदारी घ्यावी. सदर जनसुनावणीमध्ये कोणत्याही प्रकारचा निर्णय घेण्यात येत नाही. पर्यावरण विषयक जनसुनावणीमध्ये प्रकल्पग्रस्त नागरीकांचे प्रकल्पाविषयीचे मत नोंदविण्यात येतात. आपल्या सर्व मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. कंपनी प्रशासनाने देखील दिव्यांग व्यक्तिंच्या रोजगाराबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावा. |

## ४१) श्री. लक्ष्मणराव पारखी, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीमध्ये ज्या नागरीकांना नौकरी मिळत नसेल अशा नागरीकांना रू. ३०,०००/- याप्रमाणे मासिक पेन्शन निवृत्तीच्या वयापर्यंत कंपनीतर्फे देण्यात यावे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

४२) **श्री. जनार्दन गोपाळराव देठे, बेळगाव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी ९-१० ग्रामपंचायतींना आमेंत्रित करण्यात आले आहे. परंतु आमच्या गावातील जमीन अधिग्रहीत करण्यात आलेली नाही. सदर प्रकल्पापासून बेलगाव हे दीड ते दोन किलोमीटर अंतरावर स्थित आहे. बेलगांव, कोंढाळा व येन्सा या गावातील पाणी हे फ्लोराईडयुक्त आहे. सिमेंट बनविण्याकरिता लागणाऱ्या दगडाचे उत्खनन करतेवेळी कंपनीच्या लक्षात आले असेल की या भागामध्ये पाण्याची मुबलकता किती आहे. या भागातील पाणी फ्लोराईडयुक्त असून पिण्यास अयोग्य आहे. सन २००५ पासून बेलगांव भूमिगत खाण या क्षेत्रात कार्यरत असून सदर कोळसा खाणीकडून आमच्या ग्रामपंचायतीला सीएसआर निधी प्राप्त झालेला नाही. गावाच्या विकासाच्या दृष्टीने त्यांनी कोणत्याही प्रकारचे काम केलेले नाही. सदर कंपनीच्या उत्खननामुळे आमच्या गावातील पिण्याच्या पाण्याचे बोअरवेल कोलॅप्स झाले आहे. पिण्याच्या पाण्याचीच नव्हे तर इतर कामासाठी वापरण्यासाठी देखील आमच्या गावात पाणी उपलब्ध नाही. वेळोवेळी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे बैठका घेऊन देखील त्याबाबत काही उपाय निघाला नाही. परिसरातील गावांमध्ये पिण्याच्या तसेच इतर उपयोगाकरिता पाण्याची सोय कंपनीने उपलब्ध करून द्यावी. मे. सनफ्लॅग अंडरग्राऊंड खाणकडून आमच्या गावाला कोणताही सीएसआर (CSR) निधी प्राप्त झालेला नाही. आमचे बोअरवेल कोसळले आहे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, स्थानिक गावकऱ्यांसाठी पाण्याच्या उपलब्धतेबाबत कंपनीने योग्य त्या उपाययोजना कराव्या. |

४३) **श्री. हर्षद आवारी, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | स्थानिकांच्या मागण्यांबाबत कंपनीकडून लेखी आश्वासन देण्यात यावे. कोंढाळा, निमसडा व दहेगाव येथील ग्रामस्थ येथे जनसुनावणीकरिता उपस्थित आहेत. कंपनीचे प्रमुख या ठिकाणी उपलब्ध नाहीत त्यामुळे त्यांच्याकडून उत्तर मिळणे देखील अपेक्षित नाही. गावांचे पुनर्वसन झालेच | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | पाहिजे. कंपनीच्या व्यवस्थापनाला सिमेंट उद्योगामुळे भविष्यात होणाऱ्या नूकसानीची कल्पना आहे. गावातील स्थानिकांना रोजगारात प्रथम प्राधान्य देण्यात येईल असे लेखी आश्वासन पाहिजे. | |

## ४४) श्री. अनिल दगडुजी साळवे, देहेगाव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमचे शेत कंपनीने विकत घेतलेले आहे. आम्ही नजीकच्या गावामध्ये शेती विकत घेतलेली असून त्या ठिकाणी विद्यूत पुरवठा देण्यात यावा अशी माझी विनंती आहे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, याबाबत पत्रव्यवहार करण्यात यावा. जिल्हा प्रशासनातर्फे महावितरण कंपनीकडे पाठपुरावा करण्यात येईल. |

## ४५) श्री. भानुदास उद्धव बोधाणे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीमुळे प्रदूषण होणार असून फक्त झाडे लावुन प्रदूषण कमी होणार नाही. माझी विनंती आहे की शेतकऱ्यांना कार्बन क्रेडीट उपलब्ध करून द्यावा जेणेकरून शेतकऱ्यांचे नूकसान होणार नाही पर्यायाने कंपनीचे उद्दीष्ट देखील साधले जाईल. कंपनीला दररोज किती पाण्याची गरज असणार याबाबत माहिती देण्यात यावी. तसेच पाणी कुठून उपलब्ध करणार व पाण्याचा किती प्रमाणात पुनर्वापर करण्यात येईल याची माहिती देखील देण्यात यावी. प्रक्रिया केलेले सांडपाणी शेतकऱ्यांना सिंचनाकरिता उपलब्ध होऊ शकणार याची माहिती देण्यात यावी. कंपनीने भूजल उपसा केला तर शेतकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण होईल व पाणी उपलब्ध राहणार नाही. शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिट उपलब्ध करून द्यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सिमेंट उत्पादनाकरिता दररोज १३६८ किलोलिटर इतक्या पाण्याची गरज असणार आहे. त्यपैकी १२५३ किलोलिटर प्रतिदिन फ्रेश वॉटरची गरज असणार आहे. सदर प्रकल्पामधून ११५ किलोलिटर प्रतिदिन पाण्यावर प्रक्रियाकरून पुनर्वापर करण्यात येईल. सुरूवातील बोअरवेलद्वारे पाणी उपसा करण्यात येईल व खाण सुरू झाल्यानंतर खाणपाण्याचा वापर सिमेंट उत्पादनमध्ये करण्यात येईल. |

४६) **श्री. रविंद्र पंढरी भोयर, सरपंच, गट-ग्रामपंचायत येन्सा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अस्तित्वात असलेल्या कोळसा खाणीने काही वर्षांपूर्वी देखील आश्वासने दिली होती परंतु दिलेली आश्वासने पूर्ण केलेली नाहीत. तसेच गावामध्ये फिल्टर प्लांट बसविण्यात आला होता. कोळसा खाणीतून निघणारे सांडपाणी नाल्याद्वारे नदीमध्ये मिसळत आहे. कंपनीने प्रक्रियाकृत पाणी पिण्यास योग्य असल्यास पिण्याकरिता द्यावे किंवा जनावरांसाठी द्यावे. तसेच भूजल पातळी वाढविण्याकरिता जमीनीमध्ये सोडावे. जमीनीतून पाण्याचा उपसा केल्यास आणखी नूकसान होऊ शकते. कंपनीने परिसरात मोठा पिण्याच्या पाण्याचा प्लांट उभारावा व सर्व गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा पूरवावी. प्रस्तावित सिमेंट प्लांट पासून जवळपास १५०-२०० मीटरवर कोंढाळा गाव स्थित आहे. कोंढाळा गावाचे पुनर्वसन व्हायलाच पाहिजे. जमीन अधिग्रहण प्रक्रियेमध्ये याबाबत तरतूद आहे. कंपनीने जमीन अधिग्रहण कायद्याचे अधिग्रहण करताना पालन केलेले नाही. प्रकल्पाची जनसुनावणी सुरू असताना वैयक्तिक टिका-टिप्पणी करणे योग्य नाही. वैयक्तिक टिका-टिप्पणी करणाऱ्या व्यक्तिवर गुन्हा दाखल व्हायला पाहिजे. ५ किलोमीटर क्षेत्रामध्ये होणाऱ्या शासकीय व सार्वजनिक बांधकामाकरिता सिमेंट ५० टक्के सवलतीवर द्यावे. कंपनीने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबातील किमान एका व्यक्तिमध्ये कौशल्याचा विकास करून त्याला कंपनीमध्ये कायमस्वरूपी नौकरी द्यावी. तसेच प्रकल्पग्रस्ता कुटुंबातील वृद्ध व्यक्तिला रू. २०,०००/- प्रमाणे मासिक पेन्शन कंपनीने द्यावी. मे. सनफ्लॅग खाणीतून निघणारे पाणी नाल्यात सोडले जात आहे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनीने आपल्या मागण्यांचा सकारात्मक विचार करावा. |

४७) **श्री. गोपाळ मारोती नन्नावरे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने माझ्या शेतीच्या सभोवतालची जमीन अधिग्रहीत केलेली आहे परंतु माझे अधिग्रहीत केलेले नाही. माझ्या शेतीमध्ये जनावरांचा खूप त्रास असून शेतीचे उत्पन्न घेणे कठीण झाले आहे. त्यामुळे माझी कंपनीला विनंती आहे की त्यांनी माझे शेत विकत घ्यावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

४८) **श्री. सुनिल देशमुख, पर्यावरण विभाग प्रमुख, मे. श्री सिमेंट लिमिटेड:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | महिलांकरिता स्वयंसहायता बचत गटांची स्थापना करण्यात येईल. तसेच व्यायवसायिक प्रशिक्षण जसे शिवणकाम, भरतकाम, शेळी पालन, दुग्धव्यवसाय, ब्युटी पार्लर, संगणक चालविण्याचे प्रशिक्षण इत्यादी प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येईल. कर्ज व अनुदानासाठी लागणारे प्रशिक्षण देखील दिले जाईल. तसेच अस्तित्वात असणाऱ्या स्वयंसहायता बचत गटांना सक्षम केले जाईल. प्रकल्पग्रस्त क्षेत्रामध्ये अस्तित्वात असणाऱ्या शाळांचे डीजीटलायजेशन केले जाईल व ई-लर्निंग सुरू करण्यात येईल. त्यामध्ये संगणक सुविधा व इतर सुविधांचा समावेश असेल. गरीब विद्यार्थ्यांकरिता पुस्तके व शालेय सामग्रीचे वाटप कंपनीमार्फत सीएसआरच्या माध्यमातून केले जाईल. तसेच वृक्षारोपण देखील केले जाईल. शाळेमध्ये अभ्यासिकाकरिता लागणाऱ्या सामग्रीचे वाटप सीएसआरच्या माध्यमातून करण्यात येईल. खुल्या व बंद व्यायामशाळेकरिता सहकार्य कंपनीमार्फत केले जाईल. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सामुदायिक भवनाकरिता आर्थिक सहाय्य कंपनीमार्फत करण्यात येईल. शेती प्रशिक्षण व आधुनिक शेती यंत्र सामग्रीच्या वापराबाबत तज्ञ मंडळीकडून मार्गदर्शन घेण्याची सुविधा देखील पूरविण्यात येईल. त्यामध्ये कीड नियंत्रण, बियाणांची निवड या बाबींचा समावेश असेल. दग्धव्यवसाय, मत्स्यपालन व मधमाशी पालन याबाबत देखील प्रशिक्षण देण्यात येईल. वर्षातून एकदा सहलीचे आयोजन करण्यात येईल जेणेकरून आधुनिक शेती पद्धतीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळेल व त्याचा फायदा शेतकऱ्यांना होईल. स्थानिक सुशिक्षित युवक व युवतींसाठी करिअर मार्गदर्शनासाठी योग्य ते सहकार्य करण्यात येईल. तसेच याबाबत स्थानिक ग्रामपंचायतींना देखील याबाबत सहकार्य करण्यात येईल. विद्यार्थ्यांना क्रिडा प्रशिक्षण देखील देण्यात येईल. अस्तित्वात असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये लागणाऱ्या सामग्रीबाबत सीएसआर मार्फत वाटप करण्यात येईल तसेच आरोग्य केंद्राचे नूतनीकरण देखील करण्यात येईल. तसेच उपचाराकरिता लागणारे एक्स-रे मशीन, ईसीजी मशीन व डोळे तपासण्याकरिता लागण्याऱ्या यंत्राचे सीएसआरच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच स्थानिकांच्या आरोग्याची तपासणी करण्याकरिता वेळोवेळी आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात येईल. स्थानिकांसाठी रूग्णवाहिकेची सुविधा ग्रामपंचायतींच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच अग्निशामकची सुविधा देखील पूरविण्यात येईल. ग्रामपंचायतींच्या माध्यमातून सीएसआर निधीचा वापर करून सौर पथदिवे उभारण्यात येतील. खाणीतून चुनखडीचे उत्खनन करताना ब्लास्टींग करताना अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल जेणेकरून ब्लास्टींगमुळे स्थानिकांचे नूकसान होणार नाही. ब्लास्टींग खाण सुरक्षा महासंचालकांच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार केला जाईल. सिमेंट उद्योगाच्या वाहतूकीकरिता वेगळ्या रस्त्याचे बांधकाम करण्यात येईल. तसेच प्रदूषणाबाबत |

| | |
|---|---|
| | सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे वायु व जल प्रदूषणाबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. स्थानिकांना रोजगारामध्ये प्रथम प्राधान्य देण्यात येईल. प्रकल्पाकरिता आवश्यक जागा आम्ही खरेदी केलेली आहे. रस्त्याच्या बांधकामाकरिता कंपनीला जागा खरेदी करावी लागणार आहे त्याव्यतिरिक्त कंपनीला जागेची गरज नाही. |

४९) मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर:-

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | आयकर विभागाकडून स्थानिक शेतकऱ्यांना येणाऱ्या नोटीसीबाबत कंपनी प्रशासनासोबत प्रकल्प प्रतिनिधींनी चर्चा करावी. तसेच स्थानिकांना कंपनीच्या सनदी लेखापाल व वकील यांचे पूर्ण सहकार्य उपलब्ध करून द्यावे. त्याबाबत स्थानिक पातळीवर एक केंद्र सुरू करण्यात यावे. |

५०) श्री. रामा भद्रुजी बोढाणे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सर्व शेतकऱ्यांची जमीन समान दराने कंपनीने खरेदी करावी व शेतकऱ्यांना समान मोबदला मिळावा. अन्यथा माझ्या शेतीचा ताबा मी कंपनीला देणार नाही. जमीन अधिग्रहण करताना संपूर्ण गावासोबत संपर्क करण्यात का आला नाही. सदर प्रकल्प फक्त सिमेंट फॅक्ट्री करिताच उभारण्यात येणार आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. जमीनीचा मोबदला देताना तफावत का करण्यात आली याची माहिती देण्यात यावी. सर्व शेतकऱ्यांना समान मोबदला का देण्यात आला नाही. मी माझे शेत सोडणार नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, हा वैयक्तिक मुद्दा असून याबाबत चर्चा करून तोडगा काढण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगतिले की, प्रकल्प प्रवर्तकांनी व्यवस्थापनासोबत चर्चा करून तोडगा काढावा.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, गावातील जमीन ही शेतकऱ्यांसोबत चर्चा करून त्यांच्या सहमतीने घेण्यात आली आहे. प्रकल्पाकरिता लागणारी जमीन कंपनीने विकत घेतलेली आहे. |

५१) श्री. स्वप्निल चिकटे, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोंढाळा गावातील प्रत्येक व्यक्तीचा १०० टक्के आरोग्य विमा कंपनीकडून काढण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनी व्यवस्थापनासोबत चर्चा करून स्थानिकांसाठी सर्व सोई सुविधा पूरविण्यात येईल. याबाबत |

| | | |
|---|---|---|
| | | सीएसआरमध्ये विचार करून तरतूद करण्यात येईल. |

५२) श्रीमती लीलाबाई मारोती भुते, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे शेत कंपनीने कमी दराने विकत घेतले. तसेच आमचे बँक खाते असून देखील मोबदल्याची रक्कम आमच्या नावावर दूसरे बँक खाते उघडून त्यामध्ये का टाकण्यात आले? आमच्यावर आयकर लागला. त्याची भरपाई कंपनीने करून द्यावी. आमच्या शेतीचा मोबदला वाढवून देण्यात यावा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

५३) श्री. विशाल नानाजी पारखी, सरपंच, ग्रामपंचायत देहेगाव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने स्थानिकांना मोबदला सेव्हींग खात्यामध्ये दिले. बँकेच्या नियमानूसार सेव्हींग खात्यामधून वर्षाला रू. २० लाखांची उलाढाल होऊ शकते. तसेच करंट खात्यामधून रू. ५० लखांची मर्यादा आहे. रू. २० लाखांपेक्षा जास्त उलाढाला झाली तर त्याचे टीडीएस कपात करण्यात येते. याबाबत शेतकऱ्यांना माहिती नाही. टीडीएस कपात होऊ नये याकरिता आयकर भरावा लागतो परंतु शेतकऱ्यांना याबाबत माहिती नाही. त्याची जबाबदारी कंपनीने घ्यावी. कंपनीने स्थानिकांना इन्कम टॅक्स रिटर्न भरण्याकरिता मदत करावी. माझ्या मुलाला कंपनीने नौकरी द्यावी. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी यांगितले की, स्थानिकांना कंपनीच्या सनदी लेखापाल व वकील यांचे इन्कम टॅक्स भरण्याकरिता पूर्ण सहकार्य उपलब्ध करून द्यावे. त्याबाबत स्थानिक पातळीवर एक केंद्र सुरू करण्यात यावे. |

५४) कु. जया देविदास गौरकार, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने खोटे विक्रीपत्र का दाखवले याचे स्पष्टीकरण कंपनीने द्यावे. आमच्या शेती रू. ३५ लाखप्रमाणे विकत घेतले आहे व रू. ३० लाखप्रमाणे दाखविण्यात आले आहे. यानूसार गावकऱ्यांची फसवणूक करण्यात आली | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे व याचे ईतिवृत्त पर्यावरण, वने व वातावरणीय |

| | | |
|---|---|---|
| | आहे. सर्व शेतकऱ्यांना समान मोबदला दिल्याशिवाय शेतीचा ताबा सोडण्यात येणार नाही व प्रकल्प चालु होऊ देणार नाही. कंपनीने स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे अन्यथा शेतीचा ताबा सोडणार नाही व कंपनी चालु होऊ देणार नाही. | बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात येणार आहेत. |

## ५५) श्री. विठ्ठल अजबराव सातपुते, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | रामा बोधाणे यांनी सांगितल्यानूसार कंपनीच्या प्रतिनिधीने ४० च्या वर जाणार नाही. कंपनीचे प्रतिनिधी श्री. उत्तरवार यांनी जमीनीचा दर रू ३० लाखांपेक्षा अधिक दरामध्ये खरेदी करणार नसल्याचे सांगितले होते. परंतु तसे झाले नाही. कंपनीने ज्यादा दराने जमीनी कशा काय विकत घेतल्या. कंपनीने स्थानिकांची फसवणूक करू नये. श्री. उत्तरवार यांना जनसुनावणीकरिता उपस्थित करायचे होते. त्यांच्याकडून जमीनीच्या व्यवहाराबाबत उत्तरे अपेक्षित होती. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ५६) श्रीमती जयश्री चौधरी, सरपंच, ग्रामपंचायत निमसडा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने पाणी सर्व गावांसाठी उपलब्ध करून द्यावे. कंपनीच्या अहवालामध्ये पाण्याचा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ५७) श्री. हर्षद आवारी, कोंढाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने माझ्या एकही प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. कोंढाळा गावाचे पुनर्वसन करण्यात यावे. गावाचे पुनर्वसन झाले तर कंपनीला आवश्यक सहकार्य करण्यात येईल. आम्ही कोंढाळा ग्रामवासी भाग्यवान आहोत की आमच्या | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | गावामध्ये सिमेंट प्रकल्प सुरू होणार आहे. सिमेंट प्रकल्पामुळे आमच्या गावाचा विकास होईल. | |

ऑनलाईन माध्यमातून कोणताही सहभागी उपस्थित नव्हता. पर्यावरणीय जनसुनावणीदरम्यान संपूर्ण कालावधीत ऑडिओ व व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात आले होते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ०९ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(उमाशंकर भादुले)**
समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(तानाजी यादव)**
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(डॉ. नितीन रा. व्यवहारे)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर.